# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB · Racold · legrand · HAVELLS · Finolex · KOLORS · USHA · PHILIPS · SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २०३ वा मंगळवार दि.०९ जानेवारी २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## भाजपा रेल्वे प्रकोष्टच्या वतीने खासदार सुधाकर शृंगारे यांचे अभिनंदन

लातूर : लातूरला पीटलाईन करावी ही मागणी गेल्या अनेक दिवसांपासूनची होती. नुकतीच ही मागणी रेल्वे खात्याने मंजूर केली आहे. तसेच या पूर्वीही खासदार सुधाकर शृंगारे यांच्या प्रयत्नातून लातूरच्या रेल्वे स्टेशनच्या सुशोभीकरण व अत्याधुनिक सोयी सुविधा देण्यासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. लातूरकरांना रेल्वेच्या माध्यमातून जास्तीत जास्त सेवा देण्यासाठी खासदार सुधाकर शृंगारे यांनी अतिशय तळमळीने प्रयत्न केल्याबद्दल भाजपा प्रकोष्टच्या वतीने त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. या वेळी लातूर शहर जिल्हा भाजपा रेल्वे प्रकोष्टच्या संयोजक रश्मी सुबोध बेळंबे, प्रदेश रेल्वे प्रकोष्टचे सहसंयोजक श्यामसुंदर मानधना, भाजपा महिला मोर्चाच्या सदस्या आदींनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. काही दिवसांपूर्वी भाजप केंद्रीय नेतृत्वाने लातूरच्या श्रीमती रश्मी बेळंबे यांना लातूर रेल्वे प्रकोष्टच्या संयोजकपदी निवड केली. तद्नंतर लातूरला



लातूर – पुणे इंटरसिटी ही रेल्वे सुरू झाल्याने लातूरहून पुणे, मुंबईला जाणाऱ्या विद्यार्थी व इतर प्रवाशांचीही सोय झाली आहे. यासोबतच रेल्वेच्या पुढील वाटचालीसंदर्भात सूचना तसेच प्रवाशांना सुविधा देण्यासाठी या प्रकोष्टच्या वतीने वारंवार वरिष्ठांकडे लातूर रेल्वेच्या अडचणीची माहिती दिली होती. तसेच लातूरला पीटलाईन व्हावी, ही अनेक दिवसांपासूनची इच्छा होती. यामुळे लातूरहून लांब पल्ल्याच्या गाड्या जाऊ शकतात तसेच लातूर ते तिरुपती, अजमेर, धनबाद, नागपूर आदी ठिकाणी रेल्वे सुरू होतील. जेणेकरून लातूरकरांना रेल्वेचा प्रवास सुखकर होईल, अशी अपेक्षा या वेळी व्यक्त केली.

## मुंबई महानगरपालिका विभागीय सहाय्यक आयुक्तांना नवीन स्कार्पिओ होणार सेवेत दाखल.

मुंबई/ शहामत शेख.मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्तांना पुरवण्यात येणारी वाहने वारंवार बंद पडत असून आता या सहाय्यक आयुक्त करिता नवीन वाहने खरेदी करण्यात येणार आहे.यासाठी १५ नवीन वाहने खरेदी केली जाणार आहे. ही वाहने काही वर्षापूर्वीच खरेदी केलेली असून त्यांचा कालावधी संपुष्टात आला नसून ठराविक किलोमीटर एवढे वांहनाचा वापर झालेला नसताना केवळ ही वाहने बंद पडत असल्याने नव्याने स्कार्पिओ वाहने खरेदी करून ही जुनी वाहने अन्य विभागासाठी वापरण्याचा विचार मुंबई महानगरपालिकेचा आहे. चार महिन्यात येणार ताफ्यात. मुंबई महापालिकेच्या सहाय्यक आयुक्तांनी महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे स्कार्पिओ वाहने खरेदी करण्यात येत आहे.यासाठी १३ लाख ०२ हजार किमतीमध्ये स्कार्पिओची खरेदी करण्यात केली जाणार आहे .१५स्कार्पिओ साठी सुमारे २ कोटी रुपये खर्च केली जाणार आहे.ही वाहने थेट उत्पादन कंपनी कडून खरेदी केली जाणार आहेत त्यामुळे पुढील चार महिन्यांमध्ये सहाय्यक आयुक्तांच्या सेवेत दाखल होणार आहे. विशेष म्हणजे अशाप्रकारचे



स्कार्पिओ महापालिकेने डिसेंबर२०२१ मध्ये खरेदी केल्या होत्या या वाहनांचा दर ११ लाख ३४ हजार इतका होता .दोन वर्षांच्या कालावधी मध्ये दीड लाखांच्या किमतीने वाढ झाली आहे. अधिकारांच्या म्हणण्यानुसार महापालिकेच्या विभाग अधिकारांच्या वापराकरता सध्या पुरवण्यात येणारी वाहने क्षमते पेक्षा जास्त वापरली गेल्याने त्यात वारंवार बिघाड होत आहे. विभागाचे अधिकारी आपत्कालीन कामात सक्रिय होत असल्याने त्यांना वाहनाची सेवा सुरळीत मिळावी म्हणून १५ वाहने खरेदी केली जात असल्याने त्याने स्पष्ट केले.

## शेवटी प्रतीक्षा संपली शंतनु भामरेचा फायर ऑफ लव्ह रेड हिंदी फीचर फिल्म ५ जानेवारी २०२४ रोजी रिलीज झाला, त्याच्या जेलरच्या भूमिकेने चित्रपटातील मर्डर मिस्ट्री सोडवली!

मुंबई / के. रवि (दादा):–शेवटी प्रतीक्षा संपली शंतनु भामरेचा फायर ऑफ लव्ह रेड हिंदी फीचर फिल्म ५ जानेवारी २०२४ रोजी रिलीज झाला, त्याच्या जेलरच्या भूमिकेने चित्रपटातील मर्डर मिस्ट्री सोडवली!* रोमान्स चित्रपटाच्या चाहत्यांची प्रतीक्षा अखेर संपली आहे कारण बहुप्रतिक्षित फायर ऑफ लव्ह: रेड ५ जानेवारी २०२४ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. प्रसिद्ध चित्रपट निर्मात्याने दिग्दर्शित केलेला हा आगामी रोमँटिक ड्रामा, सर्व–स्टार कलाकार आणि एक शूर क्रू एकत्र आणतो आणि हा एक अविस्मरणीय सिनेमॅटिक अनुभव असल्याचे वचन देतो.

या चित्रपटात कृष्णा अभिषेक, पायल घोष, शंतनु भामरे, कांचन भोर इत्यादी कलाकार आहेत. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन लिजेंड्री आणि गोल्ड मेडलिस्ट श्री अशोक त्यागी यांनी केले आहे आणि राजीव चौधरी, जगन्नाथ वाघमारे तसेच रेखा सुरेंद्र जगताप यांनी निर्मिती केली आहे. याच बरोबर सह–निर्मिती शंतनु भामरेनेही केली आहे.तसेच प्रसिद्ध कलाकार कमलेश सावंत (ज्याने दृष्यममध्ये अजय देवगणसोबत काम केले आहे. आणि भूतनाथ रिटर्न्समध्येहि अमिताभ बच्चनसोबत काम केले आहे) विरुद्ध जेलरची महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. खाकी, फोर्स इ.). अवंती प्राजक्ता आर्ट्स या बॅनरखाली हा चित्रपट अवंतिका दत्तात्रय पाटील यांनी सादर केला आहे. शंतनु भामरे हे एक बहुप्रतिभावान व्यक्तिमत्व आहे– बॉलीवूडमधील कला आणि वाणिज्य यांचा उत्तम मिलाफ! ते बॉलिवूड म्हणजेच हिंदी चित्रपट उद्योगातील निर्माता आणि अभिनेता आहे. फायर ऑफ लव्ह: रेड या चित्रपटात शंतनु भामरे यांनी जेलरची भूमिका साकारली आहे, शंतनु भामरे यांच्या पिव्होटल जेलरच्या फायर ऑफ लव्हशिवाय रेड हिंदी फीचर फिल्म पूर्ण होऊ शकत नाही, जो कमलेश सावंत ('दृश्यम' फेम) याला मदत करतो. प्रेमाच्या आगीत पोलीस: लाल! शंतनूने साकारलेली जेलरची ही महत्त्वपूर्ण भूमिका या चित्रपटाचे मुख्य आकर्षण आहे – फायर ऑफ लव्ह: रेड ! शंतनू, एक रंगमंच आणि रंगभूमीचा कलाकार असल्याने, ज्येष्ठ अभिनेते कमलेश सावंत यांच्यासमोर जेलरची ही दमदार भूमिका कोणत्याही रिटेकशिवाय साकारू शकले! फायर ऑफ लव्ह: रेड या चित्रपटात शंतनूच्या जेलरच्या कामाबद्दल अभिनेता कमलेश सावंतचे सर्वत्र कौतुक होत आहे! हा चित्रपट एक रोलरकोस्टर असेल जो प्रेक्षकांना मोहून टाकेल. त्याच्या मनोरंजक पोस्टर्स आणि टीझरसह, फायर ऑफ लव्ह: रेडने सिनेफिल्समध्ये आधीच लक्षणीय चर्चा आणि अपेक्षा निर्माण केली आहे. हा चित्रपट ५ जानेवारी २०२४ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. चित्रपटाचा ट्रेलर आणि गाणी चित्रपटाच्या दुनियेची झलक झी म्युझिकवर यापूर्वीच रिलीज करण्यात आली आहेत. या ट्रेलरमध्ये चित्तथरारक व्हिज्युअल्स, भावपूर्ण संगीत आणि दमदार परफॉर्मन्ससह प्रेम, हृदयविकार आणि विमोचनाची उत्कंठावर्धक कथेचे वचन दिले आहे जे प्रेक्षकांना चित्रपटाच्या रिलीजची आतुरतेने वाट पाहण्यास बांधील आहे. फायर ऑफ लव्ह : रेड च्या आधी शंतनूने कॉलर बॉम्ब (२०२१), मंत्र (२०१७), शत्रु (२०१३), दोस्ती के साइड इफेक्ट्स (२०१९) आणि झलकी (२०१९) हिंदी फीचर फिल्म्समध्ये विविध भूमिका केल्या आहेत. शंतनु भामरे यांनी प्रसिद्ध आजतक न्यूज चॅनलला दिलेल्या मुलाखतीत तेरी आशिकी में रोमँटिक अल्बमचे १ दशलक्ष व्ह्यूज मिळवण्याचे वचन दिले होते ज्यात त्याने मुख्य भूमिकेत काम केले होते तसेच अल्बमची निर्मिती केली होती, त्याच्या हिंदी व्हिडिओ अल्बम आणि हिंदी वेबमध्ये नवोदितांना संधी दिली. मालिका, जी अतिशय प्रशंसनीय आहे, बॉलीवूड फिल्म इंडस्ट्रीप्रमाणेच नवोदितांना ब्रेक मिळणे खूप कठीण आहे. अशाच एका हिंदी व्हिडीओ अल्बमपैकी एक त्याने तयार केलेला 'बेबी दे एक चान्स' – रोमँटिक पॉप आयटम साँग. ज्यामध्ये त्यांनी १२ नवोदितांना संधी दिली, ते प्रत्यक्षात मॉडेल होते, त्यांच्याकडे अभिनयाचा कोणताही पूर्वीचा अनुभव नव्हता, त्यांना व्हिडिओ शूटिंगपूर्वी प्रशिक्षण देण्यात आले आणि त्यानंतर प्रत्यक्ष शूटिंग महाराष्ट्राच्या अलिबाग बीचवर झाले. या हिंदी व्हिडिओ अल्बमला अल्पावधीत ३ लाख, १२ हजार ऑरगॅनिक व्ह्यूज मिळाले! शंतनु भामरेने अलीकडेच दोन हिंदी वेब सिरीज एक स्कूटर







रिस्टन का मध्ये काम केले आहे ज्यात त्याने वराची भूमिका केली आहे आणि दुसरी पूर्ण लग्न, अर्धविवाह, नो मॅरेज आहे ज्यामध्ये त्याने तांत्रिक बाबाची भूमिका केली आहे. दोन्ही हिंदी वेब सिरीज एकतर प्रतिष्ठित –ऱेूप झीळाश जढ्ढ किंवा ऊ्ळीपशू र्कीीेंरी जढ्ढ वर उश्रळलझ्ढत च्या बॅनरखाली रिलीज होतील. शॅक– द डाउट!, न्यूयॉर्क ते हरिद्वार, ब्रेकिंग न्यूज, सॉरी मदर आणि भगवा हे त्याचे आगामी हिंदी फीचर फिल्म्स आहेत. या सर्व हिंदी फीचर फिल्म्समध्ये ते महत्त्वाच्या विविध व्यक्तिरेखांच्या भूमिका साकारणार आहे. ते प्रशिक्षित आणि बहु–प्रतिभावान अभिनेता म्हणून वेगवेगळ्या भूमिका करू शकतात, मग ते गंभीर, रोमँटिक, कॉमेडी असू द्या!

## उत्तम तरकसे लिखीत शाईची नोंद या काव्यसंग्रहाचे शानदार प्रकाशन सोहळा ठाणे येथील सभागृहात संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :– ठाणे येथील मो. ह. विद्यालय येथील विद्यालयाच्या सभागृहात श्री. उत्तम दा. तरकसे ( असरढोहकर ) यांच्या शाईची नोंद या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ललित कला फाउंडेशन यांच्यावतीने सुरेश भट गझल सम्राट सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न करण्यात आला असून या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रमुख अतिथी डॉ. लक्ष्मण शिवणेकर (शिक्षण तज्ञ कवी गझलकार ) श्री भागवत बनसोडे, (गझलकार ) श्री काशिनाथ महाजन, (कवी) श्रीनिवास गडकरी, ( गझलकार रंगकरणे ) श्री. सुनील ओवाळ, (गझलकार) डॉ. कुणाल इंगळे, ( गायक, संगीतकार ) या मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन सोहळ पार पडला असून सदर कार्यक्रमाच्या विचार मंचावर श्री खंडू अढांगळे, ( कवी साहित्यिक ) श्री. राजेंद्र बनसोडे, ( जेष्ठ साहित्यिक ) श्री राजेंद्र कांबळे, ( ज्येष्ठ पत्रकार दै. महावृत्त ) यांनी हल्ली देशात होत आसलेला भ्रष्टाचार या शीर्षकातून आपली कवीता सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. या कार्यक्रमास पोलीस दलातील कवी नारायण गाडे, कवी जीवा मोरे, तसेच गझलकार सोमीनाथ सोनवणे हे मान्यवर हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा परुळेकर यांनी खूपच सुंदर केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन हे ठाण्याचे ललित कला फाउंडेशन दिलिप कारखानीस यांनी खूपच दिमागदार स्वरूपात केले असून सदरच्या काव्यसंग्रह पुस्तक रूपात येण्याकरिता सुद्धा कवी उत्तम तरकसे यांना ललित कला फाउंडेशन चे अध्यक्ष संस्थापक : दिलीप कारखानीस सर व त्यांचे कार्यकर्ते व सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केलेले आहे त्याकरिता कवी उत्तम तरकसे यांनी ललित कला फाउंडेशनचे अध्यक्ष




कार्यकारणी व सर्व सदस्यांचे मनापासून ऋण व्यक्त केले आहे. सदर पुस्तकाचे संपादन हे गझलकार श्री संदीप बोडके यांनी केले असून पुण्याचे महाजन पब्लिकेशन यांनी त्यांचे प्रकाशन केले आहे. सदर काव्यसंग्रहाचे कवी उत्तम दा. तरकसे यांचे सर्वच प्रमुख अतिथी यांनी स्तुतिस्तुमनाने कौतुक केले असून डॉ. लक्ष्मण शिवणेकर म्हणाले की, हा काव्यसंग्रह म्हणजे उपेक्षितांच्या जगण्यातील शैलीचे धगधगते ज्वलंत भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळ अशी जगण्याच्या शैलीची रचना काव्यरूपाने कवी उत्तम तरकसे यांनी या काव्यसंग्रहात सादर केली आहे असे आपले विचार व्यक्त




करत कवीचे व कविता संग्रहाचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी सर्व उपस्थित प्रमुख अतिथींनी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचा सभागृह हा रसिक जनाने खचाखच भरलेला होता ठाणे जिल्ह्यातील आजूबाजूच्या परिसरातील सर्व रसिक प्रेक्षकांनी उपस्थिती दर्शवली, कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांचे व आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे व रसिक प्रेक्षकांचे दिलीप कारखानीस यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## भारताने पाकिस्तानच्या दिशेने रोखली होती ९ क्षेपणास्त्रे, इम्रान खानची उडाली होती झोप

दिल्ली–पुलवामा हल्ल्यानंतर भारतीय हवाई दलाने बालाकोटवर एअरस्ट्राईक केली होती. त्यानंतर पाकिस्तानच्या हवाई दलाने भारताच्या हद्दीत घुसखोरी केली होती. त्याला प्रत्युत्तर देताना भारतीय हवाई दलाचे विंग कमांडर अभिनंदन वर्धमान हे विमान कोसळून पाकिस्तानच्या तावडीत सापडते होते.त्यानंतर अभिनंदन वर्धमान यांच्या सुटकेचा घटनाक्रम सर्वांनाच माहिती आहे. मात्र या घटनाक्रमाबाबत काही स्फोटक माहिती समोर आली आहे. ही घटना घडली तेव्हा पाकिस्तानमध्ये असलेले भारतीय उच्चायुक्त अजिय बिसारिया यांच्या लवकरच प्रकाशित होणाऱ्या पुस्तकामध्ये तेव्हाच्या घटनाक्रमाचा उल्लेख करण्यात आला आहे. यातील काही उल्लेख हे स्फोटक आणि भारताने तेव्हा घेतलेल्या आक्रमक मुत्सद्देगिरीचे पुरावे आहेत.या रिपोर्टनुसार तेव्हा भारताकडून कुठल्याही क्षणी क्षेपणास्त्र हल्ला होईल, या भीतीने पाकिस्तानची फे फे उडाली होती. पाकिस्तान सरकारने रातोरात बिसारिया यांच्याकडे धावन घेतली होती. तसेच चर्चे च्या माध्यमातून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला होता. पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान इम्रान खान हे नरेंद्र मोदींसोबत चर्चा करू इच्छित होते.२७ फेब्रुवारी २०१९ ची ती रात्र होती. पकडण्यात आलेले भारताचे विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांच्याकडून पाकिस्तानच्या तुरुंगात घालवलेल्या रात्रींपैकी ही पहिली रात्र होती. त्या रात्री घडलेल्या घडामोडींबाबत खूप तर्कवितर्क लढवले जात आहेत. दरम्यान, बिसारिया यांनी आपल्या पुढच्या पुस्तकातून भारताने तेव्हा दाखवलेल्या जबरदस्त मुत्सद्देगिरीचा सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे.

## संपादकीय....

# मंजी सवराच्या जगात..

स्वातंत्र्य अजूनही कडयाकपारीमधल्या अनेकांपर्यंत पोहोचलेलंच नाही. आजही ते कमालीच्या विपन्नावस्थेत वेठबिगाराचं जिणं जगताहेत.आपण नुकताच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला, पण हे स्वातंत्र्य अजूनही कडयाकपारीमधल्या अनेकांपर्यंत पोहोचलेलंच नाही. आजही ते कमालीच्या विपन्नावस्थेत वेठबिगाराचं जिणं जगताहेत. त्यांना आशेचा किरण दिसण्यासाठी स्वातंत्र्याची शंभरी गाठायची वाट बघावी लागणार आहे का?मंजी सवरा.. इंद्रियांच्या सर्व संवेदनांच्या पलीकडे गेलेला कातळ चेहरा. डोळ्यात भूतकाळाची वेदना, वर्तमानाची लगबग आणि भविष्याची आसही नाही. जेमतेम माणसाच्या उंचीचे आठ बाय आठचे कारवीचे खोपटे मंजीचे. दरवाजा म्हणजे जीर्ण लुगडयाचं फाटकं कापड टाकलेलं इतकाच आडोसा. घरातल्या वस्तू, जिन्नस सुरक्षित ठेवाव्यात म्हणून माफक दरवाजा असावा, तशी इथे आवश्यकताही नव्हती हे खोपटयात गेल्यावर लक्षात आलं. कारण खोपटयाच्या एका कडेला तीन विटांची विझलेली चूल. साधी धगही नव्हती, फक्त मूठभर राख होती आणि चुलीच्या बाजूला दोन पोक आलेल्या कळकट्ट डबडयाच्या तळाशी हळद–मिरचीची बुक्की. खूप जुनं झालेलं प्लास्टिक अधिक वापरानं दुधाळ होतं तशा दुधाळ डब्यात मीठ तं. पिशवीत काही मूठ तांदूळ आणि एक काडेपेटी. दरवाजा म्हणून घातलेलं ते जीर्ण कापड दूर सारून तिच्या खोपटयात वाकून मी आत गेलो. तिच्या डोळयाइतकीच थिजलेली चूल. गेली ४४ वर्ष सामाजिक कार्यकर्ता म्हणून तर कधी आमदार म्हणून अनेक अंत्यसंस्कार जवळून पाहिले.अग्नी दिला जाताना आसपास काही जळून विझलेल्या शेकडो चिता पाहिल्या. त्या चितांची राख आणि मंजीच्या चुलीतील राख यात काहीतरी साधर्म्य होतं. मला ते जाणवत होतं, पण सांगता येत नव्हतं.एका भांडयात शिजवलेला भात पाहून मी मंजीला विचारलं, ''भात कशाबरोबर खाणार मंजी?'' बराच वेळ मंजी माझ्याकडे पाहतच राहिली. तिला हा प्रश्न अनपेक्षित होता, यापेक्षा याचं उत्तर तिनं कधीच शोधलं नसावं वा ते शोधावं याची तिला जाणीव नसावी किंवा मग जगताना असाही प्रश्न स्वत:ला विचारायचा असतो याची सजगता तिला व तिच्यासारख्या अनेकांना नसावी. आणि प्रश्नाचं उत्तर शोधून नेमकं करायचं काय? जायचं कुठे? याचं भानच तिला परिस्थितीने दिलेलं नाही. स्वातंत्र्याच्या ७७ वर्षांनंतरही भारतासारख्या जगातील मोठया लोकशाही व्यवस्थेला यांना साधं जगणंही शिकवता येऊ नये, हे लोकशाहीचे अपयश आहे. माझ्या सामाजिक कामात मी जे झ् जे पाहिलं, निरीक्षणं नोंदवली आणि काही निष्कर्षांप्रत आलो त्यातला एक निष्कर्ष असा की साक्षरता दोन प्रकारची असते. एक शैक्षणिक साक्षरता, जी माणसाची व्यावहारिक बाजू सांभाळते आणि दुसरी जगण्याची साक्षरता. माणूस म्हणून जगण्यासंबंधीची साक्षरता. पहिली साक्षरता नसेल तर व्यक्ती व्यावहारिकदृष्टया सक्षम होण्यास अडचणी येतात आणि दुसरी साक्षरता नसेल तर व्यक्ती माणूस म्हणून किमान जगण्यासाठीही सक्षम राहत नाही. दोन्हीही साक्षरता परमपवित्र संविधानाने बहाल केलेले मूलभूत अधिकार आहेत, मात्र जर दोन्हीही साक्षरता नसतील तर व्यक्तीला पशूंपेक्षाही निम्न प्रतीचं आयुष्य कंठायचे दुर्दैव माथी येतं. तेच आजच्या सत्त्याहत्तरीतील कातकऱ्यांचे आहे. त्यांच्या माथी तेच दुर्दैव आहे. यात दोष कातकऱ्यांचा नाही, संविधानकर्त्यांचा नाही. तो असेलंच तर संविधानाचे रक्षण करणाऱ्यांचा आहे. व्यवस्थेचा आहे. ''भात कशाबरोबर खाणार?'' या प्रश्नांचे उत्तर आलं नाही मग मीच विचारलं, ''मंजी, डाळ नाही का? तेल कुठं आहे?'' तिनं खालच्या मानेनंच नाही म्हटलं. ''भातावर मिरची पावडरची लाल बुक्की टाकणार का मग?'' त्यावर मंजी मानेनेच 'हो' म्हणाली. ती, तिचा नवरा, दोन मुलं सकाळ–संध्याकाळ हेच जेवतात. भात अन् मिरचीची बुक्की आणि तेही एकाच पातेल्यात. वाढायला ताटझ्पेले काहीच नाही. खोपटाबाहेर म्हशीचं पारडू शेठनं बांधलेलं होतं. शेठने पाळलेल्या त्या परडयासाठी मजूर खुराक तयार करीत होता. विपरीतता यात ही होती की मिरचीची बुक्की कालवून सकाळझ्संध्याकाळ भात खाऊन अर्धपोटी राहणारे मंजीसारखे कैक मजूर त्यांच्या शेठने पाळलेल्या जनावरांसाठी पौष्टिक खुराक करीत असतात.भल्या पहाटेच मी भिवंडीच्या चिंबीपाडा गावातील सिद्दिक शेखच्या वीटभट्टीवर गेलो तेव्हा मंजीसारख्या दहा–बारा महिला विटांसाठी लागणाऱ्या मातीची ढेकळं फोडीत होत्या. ऐन थंडीत त्यांची लहान उघडी– नागडी मुलं खेळत होती. भट्टीवर असलेली मुले शासनाच्या आदेशानुसार जवळच्या शाळेत दाखल व्हायला पाहिजेत. त्यांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला आहे. संविधानातील अनुच्छेद–२१ नुसार घटनादुरुस्ती करून शिक्षण हक्क कायदा झाला आहे. जवळच्या जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापकांना हजेरीपट घेऊन मी बोलावले. यातील सहा वर्षांवरील मुले शाळेत दाखल आहेत का, असं विचारल्यावर ते मुख्याध्यापक माझ्याकडे फक्त बघत राहिले. हजेरीपट बघून ते म्हणाले, ''फक्त हीच मुले दाखल नाहीत. सव्र्हे केला तेव्हा मुले इथे नव्हती.'' वास्तव हे आहे की मंजीची दोन्ही मुले जन्माला आल्यापासून याच वीटभट्टीवर आहेत, परंतु शाळेच्या दप्तरी त्यांची आजतागायत नोंद नाही. एकटया भिवंडी तालुक्यात साडेचारशे वीटभट्टया आहेत. त्यात किमान दोन हजारहून अधिक मुले सहा वर्षांवरील आहेत, शिक्षण हक्क हा कायद्याने दिला आहे, पण तरीही त्यातल्या अनेकांची नोंदच नाही. ज्या मूठभरांची नोंद आहे, ते प्रत्यक्ष शाळेत जात नाहीत. शिक्षणाचा हक्क देणारी शिक्षणव्यवस्था याविषयीही पूर्णत: अनभिज्ञ आहे. जे वास्तव भिवंडीचे, तेच संपूर्ण राज्यातील कातकऱ्यांचे वास्तव आहे.भट्टीवर काम करणाऱ्या सुनिता, मंदा आणि इतर सर्वांना एकेकीला बोलावून त्यांची कहाणी मी समजून घेतली. मंजी त्यातीलच एक. गेल्या दहा वर्षांपासून ती आणि तिचा नवरा संतोष, केवळ पाच हजार रुपये फेडण्यासाठी बाराही महिने शेठचे काम करत होते. मंजीचे वडील लक्ष्मण सवराही सिद्दिक शेखकडे दहा वर्षांहून अधिक काळापासून राबत आहेत. त्यांचं कर्ज फिटत नव्हतं म्हणून त्यानं मंजीला कामाला बोलावून घेतलं. मंजीच्या नवऱ्यालाही पाच हजार रुपये बयाना देऊन कामावर ठेवलं. गेली दहा वर्ष पाच हजार रुपये बयानाकरिता मंजी व मंजीचा नवरा सिद्दिककडे वर्षभर दिवसरात्र काम करत आहेत. उन्हाळ्यात ढेकळे फोडणे, चिखल करणे, विटा पाडणे आणि पावसाळ्यात शेतीची सर्व कामे करणे, गवत कापणे अशी कामे ती करतात.

# फिल्म सत्यशोधक चे निमित्ताने.....

छ संभाजी ब्रिगेड चे संस्थापक व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आदरणीय प्रवीण जी दादा गायकवाड साहेब यांनी प्रवीण तायडे यांनी निर्मित केलेला सत्यशोधक हा क्रांतीबा जोतीराव जी फुले यांच्या जीवनावर बेतलेला चित्रपट, त्याचा ट्रेलर, आणि या चित्रपटावर व तो सर्व बहुजनांनी चित्रपट गृहात जाऊन पहावा असे केलेले आवाहन आणि त्याचे केलेले मार्मिक विवेचन माझ्या सद्भग्याने आम्ही एक मेकांना व्हॉट्सप चे माध्यमातून जोडलो गेलेलो असल्याने माझ्या कडे ही आल्या,यावर मी ही कांहीं तरी लिहावे अशी सूचना ही त्यांनी केली,ती सूचना आहे असे न समजता बहुजन वादी व विवेकवादी चळवळीचे नेते या नात्याने त्यांनी दिलेला तो आदेश आहे असे मी समजतो,याचे कारण फक्त बोलघेवडे पणा करणारे अनेक नेते असतात पण समग्र जीवन समाजासाठी समर्पित करणारा असा प्रवीण दादा सारखा एखादाच नेता असतो.वास्तविक पाहता दादा ची मांडणी इतकी विस्तृत आहे की फक्त ती सर्व समाज घटका पर्यंत पोहचली तर त्या साठी वेगळे प्रयास करण्याची कोणतीच आवश्यकता उरणार ही नाही.आमच्या दोघांच्या विचाराचे सार वेगळे असण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही, याचे कारण आमचा पाया तोच आहे

महात्मा जोतिबा फुले,हे नाव देशाला माहीत आहे,आणि या देशातील सामाजिक क्रांतीचे चक्र निर्भिडपणे फिरवण्यात कुणाचे योगदान मौल्यवान असेल तर ते फक्त महात्मा जोतिबा फुले यांचे आहे,पुण्यातील पेशवाईचा नुकताच अंत झालेला,आणि देश भरात ब्रिटिश राजवटीच्या खऱ्या कालखंडाला सुरुवात झालेली असताना या सामाजिक सुधारणेला आणि कठोर अश्या धर्म चिकित्सा याला प्रथम हात घातला तो फुले यांनीच अर्थात धर्म,रूढी,परंपरा याने सर्वोच्य स्थानी असलेला आणि सामाजिक मान्यता याने शिरोधार्य असलेला पूजनीय मानलेला सर्व श्रेष्ठ वर्ण फक्त नी फक्त ब्राम्हण होता.इतर कोणत्याही धर्मात एखादा पुरोहित म्हणून निर्माण होत असे,परंतु या साठी ती व्यक्ती त्या धर्मातील असावी इतकाच नियम असे,तत्कालीन वर्ण व्यवस्थेने ब्राम्हण वगळता इतर सर्व वर्णीयांना शूद्र अतिशूद्र व्यवस्थेत ढकलले आणि त्या साठी ब्रम्हा नावाचे मिथक उभे केले, या वर्ण व्यवस्थेला विरोध करताना महात्मा फुले यांनी त्या ब्रम्हा वरच प्रश्न चिन्ह निर्माण केले, इतिहासाचे अन्वेषण करताना त्यांच्या इतके कठोर भाष्य आजच्या काळात ही केवळ अश्यक्यप्राय आहे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्टपणे विदित केले आहे की,व्यक्ती शिक्षित होणे, पदवीधर होणे तुलनेने सोपे आहे परंतु ती तर्क निष्ठ होणे,विचारशील बनणे केवळ कांहीं लोकांनाच श्यक्य आहे.महात्मा फुले हे केवळ बोलघेवडे सुधारक नव्हते तर ते व्यवस्थेचे,मग ती धार्मिक,सामाजिक, आर्थिक,राजकीय अश्या समग्र व्यवस्थेचे चिकित्सक होते,या चिकित्सा खाजगीत करणे आणि त्या सार्वजनिक रित्या करणे यातील धोके आज ही इतके तीव्र आहेत तर २०० वर्षापूर्वीची स्थिती काय असेल? याचा ही विचार केला तर अंगावर काटे उभे राहतात,ते ही पुण्या सारख्या शहरात जिथे कर्मठ ब्राम्हणी सत्तेची राजधानी अस्तित्वात होती आणि हा समाज तिथे बहु संख्याक स्थितीत अस्तित्वात होता.

कार्ल मार्क्स यांनी जागतिक पातळी वरील आर्थिक सिद्धांत मांडला तो भांडवल दार वर्गाकडून कामगार वर्गाचे होणारे शोषण आणि त्यातून निर्माण होणारे वरकड मूल्य यातून भांडवल दार वर्ग अधिकाधिक श्रीमंत होत जातो,तर कामगार वर्ग अधिकाधिक गरीब होत जातो,म्हणून त्यांनी शोषक आणि शोषित अशी व्याख्या केली,परंतु हा सिद्धांत भारतात जसा तसा लागू होत नव्हता,भारताचे खरे विश्लेषण महात्मा फुले यांनी केले आणि शूद्र अतिशुद्रच्या गरीब असण्याला वर्ण व्यवस्था कारणीभूत असल्याचे निदर्शनास आणून दिले,हे शूद्र का खचले? तर त्यांना विद्याहिन बनवल्या ने हे त्याचे साधे सरळ कारण त्यांनी सांगितले, विद्या नसल्याने मती गेली, मती नसल्याने धन ही गेले, आणि वित्त विना शूद्र खचले,मराठा,राजपूत अश्या क्षत्रिय समाजाने तलवारी चे जोरावर शौर्य दर्शवून राज्य निर्माण केली परंतु हीच राज्यव्यवस्था धर्म सत्तेच्या अंकित राहिल्याने त्याचा उपभोग मात्र पुरोहित वर्गाने घेतला,हजारो जाती चे कोंडाळे निर्माण करून त्यात इतकी गुंतागुंत निर्माण केली,ज्याचा गुंता आज ही सुटता सुटत नाही,कोणी श्रेष्ठ कोणी कनिष्ठ या भावना इतक्या पराकोटीच्या आहेत की आज ही प्रत्येक व्यक्ती जात समूहाचा घटक म्हणून जीवन जगत आहे.प्रस्थापित शोषण कर्ता फक्त आपल्या जात समूहाचा आहे म्हणून नायक बनवला जातो,तोच समाजाचा आयकॉन बनवला जातो,म्हणून इथे शोषकांच्या विरोधात शोषितांची लढाई ही उभी राहत नाही,हे वास्तव बदलण्या साठी समाज परिवर्तन शील बनला पाहिजे, या साठी इतिहास समजून घेतला पाहिजे,पुस्तके वाचली पाहिजेत,पण आजच्या व्हॉट्सप चे काळात ही पुस्तके वाचणारा वर्ग आकुंचित होत चालला आहे हे वास्तव आहे

इतिहासाचे ज्ञान नसेल तर तो गवंडी बनू शकतो,रचनाकार किंवा स्थापत्य विशारद बनू शकत नाही अश्या अर्थाची इंगर्जी भाषेतील म्हण अस्तित्वात आहे,तो इतिहास जसा पुस्तकातून मांडला जातो तसाच तो नाट्य आणि चित्रपट याचे सारख्या माध्यमातून ही मांडला जातो,तो कशाच्या ही माध्यमातून मांडला गेला तरी असा इतिहास हा सत्य असू शकतो, किंवा अर्धसत्य असू शकतो, किंवा पूर्णतया काल्पनिक ही असू शकतो,तो कसा? आणि कुणी मांडला आहे यावर त्याची सत्यता अवलंबून असते,आणि त्या मागील हेतू ही महत्वाचा असतो.आदरणीय प्रवीण दादा गायकवाड साहेब यांनी तो सिनेमा पहावा म्हणून केलेले आवाहन पाहता मला खात्री आहे की हा चित्रपट नक्कीच त्यांच्या सत्य पारखी दृष्टीस पसंत पडलेला असेल,



सोनार सोन्याची पारख सोन्याला कसोटीच्या दगडावर घासून पाहतो, हा कसोटीचा टप्पा प्रवीण दादा चे आवाहनाने पार केलेला आहे असे माझे स्पष्ट मत आहे , या सर्व लढाई तील फुले दांपत्य यांची जीवन कथा, त्यांचा संघर्ष, आणि सामाजिक क्रांती कारि बदला वरील अविचल निष्ठा,त्यांच्या लढाईत साथ दिलेले लहुजी वस्ताद सारखे बहुजन नायक,या सर्व इतिहासाची उजळणी लेखात करणे अनावश्यक ठरते याचे कारण तोच चित्रपटाचा आशय आहे,पण ज्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या जागतिक विद्वान नेतृत्वाने,आणि आयुष्यभर समाजाच्या उद्धारा साठी संघर्ष करणाऱ्या घटना कारानी ज्यांना आपले गुरू मानले,त्यांच्या प्रति मी अधिक काय बोलावे? ज्या माई सावित्री यांना महात्मा जोतिबा फुले यांनी घडवले आणि स्त्री शिक्षणाचा पाया त्यांनी घालून दिला त्या साऊ म्हणजे

साऊ ,,,,,पेटती मशाल साऊ ,,
आग ती जलाल साऊ,
शोषितांची ढाल साऊ,
मुक्ती च पाऊल ,,,

हा सारा संघर्ष आपण त्या काळात जाऊन पाहू शकतो,

बहुजन नायकांच्या जीवन चरित्रावर आधारित नाट्य, चित्रपट अश्या कलाकृती ना समाजाचा आर्थिक हातभार लागला तरच हे प्रयास टिकून राहू शकतील,आजच्या प्रति क्रांती कारि सत्ता काळात हे धाडस दर्शविणारे निर्माते,कलाकार हे सर्व क्रांती कारक आहेत, त्यांना सपोर्ट म्हणून आपण फक्त एवढेच करायचे आहे,आपण स्वतः,आपल्या घरातील सर्व सदस्य,आपले मित्र परिवार यांनी चित्रपट गृहात जाऊन हा सिनेमा पाहिला पाहिजे, तो ५ जानेवारी २०२४ ला सर्वत्र प्रसारित झालेला आहे, आपल्या नजीकच्या चित्रपट गृहात जाऊन तो पहावा अशी मी विनंती करतो

जय जिजाऊ,जय जोती,जय भीम

ऍड.अविनाश टी काले,अकलूज,जिल्हा सोलापूर.
मो न ९९६०१७८२१३

# टिकवूया मातीचा कसडू

जमिनीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी वर्षानुवर्षे रासायनिक घटकांचा वापर केल्यामुळे मातीचा पोत बिघडला. पूर्वीच्या काळी मातीची उत्पादकता कायम राखणारे आणि वाढविणारे घटक नेमके कोणते, हे शास्त्रीय भाषेत शेतक–यांना ठाऊक नव्हते; परंतु हे घटक पिकांना मिळतील अशा प्रकारे पिकांचे चक्र कसे आखावे, याचे ज्ञान त्यांना होते. हजारो वर्षांपासून जोपासलेल्या या शेतीपद्धतीने रासायनिक घटकांचा वापर सुरू होण्याच्या काळापर्यंत जमिनीची उत्पादकता टिकवली. जमिनीचा पोत कायम राखून निसर्गसाखळी अबाधित राहील, हेच या पुढे शेती क्षेत्रातील संशोधनाचे उद्दिष्ट असायला हवे.

प्रमाणे जगाच्या प्रत्येक भूभागात वेगवेगळी खनिजसंपत्ती आढळते तसेच प्रत्येक भागात वेगवेगळी पिके येतात. एकाच देशाच्या विविध भागांमध्ये पिकांमध्ये वैविध्य आढळून येते. आपल्याही देशात वेगवेगळ्या राज्यांमधील पिके वेगवेगळी आहेत आणि त्यामुळेच त्यातील खाद्यसंस्कृतीही वेगवेगळी आहे. म्हणूनच आपण पंजाबात गेल्यावर तेथील खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतो तर बंगालमध्ये वेगळ्या पदार्थांची चाखू शकतो. महाराष्ट्राची खाद्यसंस्कृती वेगळी आहे आणि केरळची वेगळी. हे वैविध्यच आपली मोठी संपत्ती आहे. प्रत्येक ठिकाणची माती वेगवेगळी असल्याने, पावसाचे प्रमाण आणि भौगोलिक रचना वेगवेगळी असल्यानेच पिकांमध्ये वैविध्य आढळते; परंतु विशिष्ट नगदी पिकांच्या आकर्षणापायी आपण हे वैविध्य नष्ट करण्यास सुरुवात केली. तातडीने पैसा मिळवून देणारी पिके घेण्यासाठी मातीवर रासायनिक खतांचा मारा केला. रासायनिक तणनाशके आणि जंतुनाशके वापरून जमिनीचा पोत बिघडवला. मातीला 'काळी आई' किंवा 'काळे सोने' म्हणण्याची संस्कृती विसरून आपण भलत्या बदलांच्या आहारी गेलो.

मातीची उत्पादकता टिकवून ठेवणा–या शेतीच्या ज्या पद्धती आहेत ते हरितगृह वायूंचे प्रमाण कमी ठेवून जलवायू परिवर्तनाचे संकट कमी करण्यास सा भूत ठरतात, असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. म्हणूनच रासायनिक शेतीच्या दुष्परिणामांच्या पार्श्वभूमीवर जमिनीचा पोत कायम राखणा–या कृषिपद्धतींचे महत्त्व वाढले आहे. जी गोष्ट आपल्याकडे प्रचंड प्रमाणात असते तिच्याकडे आपले फारसे लक्ष जात नाही आणि त्यामुळेच त्यात झालेले बदलही चटकन लक्षात येत नाहीत. मातीचे असेच झाले आहे. आपल्या अवतीभोवती माती प्रचंड प्रमाणात असते त्यामुळे तिची गुणवत्ता ढासळल्याचे आपल्याला दिसून येत नाही मात्र, जमिनीची गुणवत्ता आणि उत्पादकता कमी झाल्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेवर आणि कोट्यवधी लोकांच्या जीवनावर मोठे दुष्परिणाम होत असतात. आपल्या भोवतालच्या मातीची स्वत:ची एक रचना असते. तिच्यात कोट्यवधी सूक्ष्म जीवाणूंचा वास असतो.

आपल्याप्रमाणेच माती श्वसन करते आणि पाणी शोषून घेण्याची, हवा शोषून घेण्याची प्रणाली मातीमध्ये असते. या प्रणालींची एक संपूर्ण साखळी मातीमध्ये असते. रासायनिक पदार्थांच्या अतिवापरामुळे ही साखळी विखंडित होते आणि त्यामुळेच जमिनीचा पोत बिघडतो.

वृक्षतोड आणि जंगले साफ करून टाकण्याचे प्रमाण प्रचंड वाढल्यामुळे जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर होते. झाडे जमिनीवर पडणा–या पावसाचा वेग कमी करतात आणि झाडांची मुळेही मातीला घट्ट पकडून ठेवतात. परिणामी उतारावरून वाहून जाणा–या पाण्याद्वारे माती वाहून जाण्याचे प्रमाण घनदाट वृक्षराजी असलेल्या भागात कमी असते; परंतु वृक्षतोड झाल्यास मातीची धूप होण्याचे प्रमाण वाढते.

पावसाच्या पाण्याची स्थानिक पातळीवर साठवणूक करण्याचे पारंपरिक मार्ग मागे पडून मोठी धरणे झाली त्यामुळे ही समस्या आणखी वाढली आहे. माती वाहून जाण्यामुळे जमिनीचा कसही कमी होतो. एकीकडे मातीचा कस कायम ठेवण्याच्या परंपरागत शेतीपद्धती मागे पडताना दिसतात तर दुसरीकडे खतनिर्मिती करणारे कारखानेही अशा रसायनांचा वापर करतात ज्यामुळे जमिनीचा कसदारपणा हळूहळू कमी होत जातो. गेल्या ५० वर्षांत रासायनिक शेतीचा प्रचार मोठ्या प्रमाणावर करण्यात आला त्यामुळे मातीला पोषक घटक प्रदान करणारी नैसर्गिक साखळीच डळमळीत झाली. उदाहरणार्थ, मातीची धारणक्षमता वाढविण्याचे तसेच हवा खेळती राहावी म्हणून माती भुसभुशीत करण्याचे काम विंचवासारखे प्राणी करतात. असे प्राणी रासायनिक घटकांमुळे जीव गमावतात आणि मग पोषक घटकांसाठी त्या मातीला सातत्याने कृत्रिमरित्या दिल्या जाणा–या रासायनिक घटकांवरच अवलंबून राहावे लागते. मधमाशा, फुलपाखरे, बेडूक आदी शेतक–यांना उपयुक्त ठरणा–या जिवांची संख्या प्रचंड प्रमाणात कमी झाली आहे. पिकांच्या परागीभवनासाठी मधमाशा अत्यंत उपयुक्त ठरतात.

रासायनिक घटकांच्या अतिरिक्त वापरामुळे शेतीलगत असणारे पाण्याचे स्रोत तसेच जमिनीच्या पोटातील जलस्रोत दूषित होतात.



सिंचनासाठी अनेक ठिकाणी भूगर्भातील पाण्याचा वापर केला जातो. हे स्रोत अधिक उपशामुळे खोलवर तर गेलेच आहेत शिवाय ते प्रदूषित झाल्यामुळे त्याचाही दुष्परिणाम पिकांवर पाहायला मिळतो. भूपृष्ठावरील जलस्रोत किंवा भूपृष्ठावर पाण्याच्या साठवणुकीचे पारंपरिक मार्ग मर्यादित झाल्यामुळे जमिनीची धूप होण्याचे प्रमाणसुद्धा वाढले आहे तसेच रासायनिक खतांमुळे मातीत आम्लांचे प्रमाण वाढून जैविक घटकांवर आणखी दुष्परिणाम होत आहे. शेतीविषयक जे संशोधन केले जाते ते प्रामुख्याने अधिक पीक मिळण्याच्या उद्देशाने केले जाते; परंतु त्यामुळे नैसर्गिक साखळीवर जे गंभीर दुष्परिणाम होतात त्याकडे कानाडोळा केला जातो. निसर्गात एकमेकांवर अवलंबून असणारे असंख्य घटक असतात. त्यांच्या क्रिया–प्रक्रियांचा अभ्यास केल्यास आपल्याला असे दिसते की, जमिनीची उत्पादनक्षमता टिकवून ठेवण्याची नैसर्गिक सोय केलेली असते. हेच नैसर्गिक घटक पिकांनाही पोषक घटक पुरवत असतात.

आपण मात्र अधिक पिकाच्या अपेक्षेने ही साखळी नष्ट केली. पिकांना अनेक पोषक घटकांची अपेक्षा असते. मातीद्वारे मिळणारे पोषक घटक काही पिकांना कमी प्रमाणात तर काही पिकांना अधिक प्रमाणात लागतात. या घटकांची शास्त्रीय नावे आपल्या पूर्वजांना माहीत नव्हती; परंतु अनेक पिढ्यांच्या अनुभवांनी त्यांना दिलेले शिक्षण मोठे होते. नायट्रोजन आणि फॉस्फरस ही नावे त्यांना सांगता येत नसतील; परंतु प्रत्येक पिकाला संतुलित प्रमाणात हे घटक कोणत्या मार्गाने देता येतील, हे त्यांना ठाऊक होते. या मार्गांचा अवलंब ते अचूकपणे करीत असत. उदाहरणार्थ, कडधान्यांच्या पिकांमध्ये हवेतील नायट्रोजन ग्रहण करण्याची मोठी क्षमता असते. हा नायट्रोजन रासायनिक खतांपासून प्राप्त न करता पिकांचे चक्र व्यवस्थित आखले जात असे. पिकांमध्ये योग्य वेळी बदल करून जमिनीचा कस टिकवून ठेवण्याचा मार्ग त्यांना ठाऊक होता. वेगवेगळ्या पिकांची मुळे जमिनीत वेगवेगळ्या अंतरापर्यंत खोल जातात. त्या–त्या भागात वेगवेगळे पोषक घटक असतात त्यामुळे पिकांचे चक्र आखताना ते आलटून–पालटून ही पिके घेत असत. एका नैसर्गिक घटकाचे उत्सर्जन करणारे एक पीक ते घेत असत तर त्या नंतरचे पीक त्या घटकाची गरज असणारे घेत असत.

शेतीपूरक जनावरे आणि अन्य जीवांची माहिती शेतक–यांना होती. शेतीउपयुक्त जनावरांचे शेण, मागील पिकांचे उरलेले अवशेष, पाने आदी घटकांच्या माध्यमातून जमिनीची उत्पादकता टिकवता आणि वाढवता येते. जनावरांपासून मिळणारे नैसर्गिक खत कमी पडल्यास फिरस्त्या पशुपालकांना आमंत्रित करून त्यांच्याकडील जनावरे शेतात ठेवत असत. पिके काढल्यानंतर त्या जमिनीवर अशा प्रकारे जनावरे राहिली तर त्यांच्या मलमूत्रापासून आणि पिकाच्या अवशेषांमधून उत्कृष्ट नैसर्गिक खत तयार होते. विविध प्राण्यांच्या मलमूत्रातून शेतीला असे कोणते घटक मिळतात जेणेकरून तिची उत्पादकता वाढते, याचे कोडे सोडविण्याचा प्रयत्न संशोधक आजही करीत आहेत. ही शेतीपद्धती जमिनीचा कस राखणारी तर आहेच शिवाय शेतक–यांच्या दृष्टीने अत्यंत स्वस्त आहे त्यामुळेच पारंपरिक शेतीकडे वळून जमिनीची उत्पादकता कायम राखण्याचे प्रयत्न या पुढे व्हायला हवेत. रासायनिकीकरणाने मातीचा कस एकदा बिघडला तर तो पूर्ववत होणे अवघड आहे.

# बौद्धजन सहकारी संघाच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव आणि शास्ता दिनदर्शिका प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

मुंबई दि. ८ :- बौद्धजन सहकारी संघ ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी या संघाच्या विद्यमाने शालांत परीक्षेत माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवीधर आणि इतर शैक्षणिक शाखांतून उत्तीर्ण होऊन पदव्या संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ आणि शास्ता दिनदर्शिका प्रकाशन सोहळा असा संयुक्त कार्यक्रम संघाचे सन्मानीय राजेश जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, शारदा सिनेमा जवळ, नायगाव, दादर (पूर्व) मुंबई - १४ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदेश गमरे यांनी अत्यंत प्रभावी शैलीने करीत सभागृहाचे मन जिंकून घेतले, कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले कार्याध्यक्ष तसेच कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष दीपक मोहिते यांनी ज्योत प्रज्वलित केली, विश्वस्त मंडळाने उदबत्ती प्रज्वलित करून पुष्पसुमन अर्पण केले, तद्नंतर धार्मिक पूजाविधी संस्कार समितीचे अध्यक्ष संदीप गमरे, सचिव कैलास मोहिते, संतोष पवार, संतोष कदम, सुविधा कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुमधुर वाणीने पार पाडला. पाहुण्यांचे स्वागत आणि प्रास्ताविक स्वागताध्यक्ष तसेच संघाचे कार्याध्यक्ष दीपक मोहिते यांनी केले प्रास्ताविक सादर करताना संघाने आजवर ५ वर्षाच्या काळात जे विविध उपक्रम राबवले त्यांचा आढावा घेत ते सर्व उपक्रम यशस्वी करण्यामागे विभाग कार्यकर्ते, विभाग अधिकारी, विभागीय कार्यकारिणी, शाखांचे पदाधिकारी यांचा सक्रिय सहभाग आणि अथक परिश्रम आहेत असे त्यांनी स्पष्ट केले, तसेच मनुवादी सरकारद्वारे सरकारी शाळांचे खाजगीकरण करून बहुजन विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण बंद करण्याचा कट रचला जात आहे तसेच घटना बदलून घटनेद्वारे तरतूद करण्यात आलेल्या सवलती बंद करण्याचे षडयंत्र रचले जात आहे म्हणून आपल्या मुलांना स्वतःच्या पायावर उभे करायला हवे असे ही त्यांनी नमूद केले त्यासोबतच आर्थिक विकासाकरता सहकार क्षेत्राच्या माध्यमातून पतपेढीची निर्मिती संघाद्वारे येत्या एप्रिल २०२४ पर्यंत करण्यात येणार आहे त्याअंतर्गत कोकणातील विद्यार्थ्यांना काजू, आंबा लागवड, लघुउद्योग इत्यादी व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य करण्यात येणार आहे, विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी क्लासेसच्या माध्यमातून ही उपक्रम राबविण्यात येणार आहेत अश्या अनेक उपक्रमांची माहिती त्यांनी दिली, तसेच मुंबई व गाव समिती यांनी आजवर सर्व कार्यक्रम एकमताने, एकविचाराने संयुक्तरित्या पार पाडले आहेत याही वेळेस गाव कमिटीने पत्र पाठवून कार्यक्रमास पाठींबा दिला आहे असे ही त्यांनी प्रास्ताविकेत नमूद केले.सदर प्रसंगी संघाचे प्रमुख विश्वस्त संजय पवार, विश्वस्त राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, के.सी. जाधव, माजी कार्याध्यक्ष एस.बी.जाधव (मळण), शिक्षण समितीचे अध्यक्ष जितीन नागे, न्यायदान कमिटीचे अध्यक्ष शशिकांत मोहिते, माजी विश्वस्त एस.बी.जाधव (वेळम) आदींनी विद्यार्थी व उपस्थितांस मोलाचे मार्गदर्शन करीत आपले अमूल्य विचार व्यक्त करून कार्यकर्त्यांनी केलेल्या कामांचे व नियोजित कार्यक्रम शिस्तबद्ध पद्धतीने आखून त्यानुसार राबविल्याबद्दल कौतुक केले, सदर प्रसंगी आजी माजी सर्व कार्यकर्त्यांना आमंत्रित करून माजी कार्यकर्ते, प्रमुख पाहुणे यांना बुद्धमूर्ती आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले तर विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा रायटिंग थिसेस अठरा खंड (मराठी अनुवाद) व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित




करण्यात आले, तसेच श्रामनेर शिबिरात ज्यांनी सहभाग घेतला त्यांना आणि वर्षावास मालिकेस वक्ता म्हणून लाभलेल्या सर्वांना बुद्धमूर्ती आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले, तसेच अक्षय दीपक मोहिते गाव कोटलुक यांना कादंबरी निमित्त स्कॉलरशिप मिळाल्याबद्दल, माधुरी अनंत जाधव यांची सहाय्यक आयुक्त पदी नियुक्ती झाल्याबद्दल व पूर्वा उमेश जाधव गाव पिंपर हिला नासा (अमेरिका) व इस्रो (भारत) या अंतराळ संशोधन केंद्रास शैक्षणिक भेट देण्यासाठी निवड झाल्याबद्दल यांना ही पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले, सदर प्रसंगी अक्षय दीपक मोहिते कादंबरीच्या जडणघडणीवर प्रकाश टाकत आपले विचार व्यक्त केले तसेच पूर्वा कदम हिने आपण शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी कसे प्रयत्न केले; तिच्या आईवडिलांनी व शिक्षकांनी त्यासाठी कशी मोलाची साथ दिली यावर आपले विचार व्यक्त केले. सदर कार्यक्रमास चिटणीस अजय जाधव, उपकार्याध्यक्ष अशोक कदम, माजी चिटणीस संजय मोहिते, संजय तांबे, संदेश जाधव, सुरेश पवार, माजी अध्यक्ष सिद्धार्थ पवार, खजिनदार प्रदीप कदम, सदस्य उत्तम जाधव, सुरेश गमरे, सहकारी संघाचे माजी चिटणीस सचिन मोहिते, माजी कोषाध्यक्ष रामदास कळंबे, माजी चिटणीस सूर्यकांत कदम, संजय तांबे, पतपेढीचे संचालक पवार, शांतिदुत जाधव, माजी हिशेब तपासनीस राजेश सावंत आदी मान्यवर, आजी माजी कार्यकर्ते या कार्यक्रमास उपस्थित राहून त्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली त्याबद्दल त्याना व पदाधिकारी, विभाग अधिकारी यांना ही सन्मानित करण्यात आले, कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी संपूर्ण कार्यक्रमाचा व व्यक्तांच्या भाषणांचा आढावा घेत आतापर्यंत संघाने कश्यारीतीने कामकाज केले, कमिटीने त्यांना कसे सहकार्य केले व भविष्यात संघ कोणकोणते उपक्रम राबविण्यात येणार आहेत याबद्दल माहिती देत पतपेढीच्या संदर्भात प्रकाश टाकत पतपेढी सुरू होण्यासाठी लवकरात लवकर सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन केले तसेच सर्वांना शुभेच्छा देत त्यांनी अध्यक्षीय भाषणास पूर्णविराम दिला सरतेशेवटी कार्यक्रमाचे सूत्रसंचालक संदेश गमरे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# राष्ट्रवादीचे ९९ टक्क्यांहून अधिक कार्यकर्ते अद्यापही शरद पवार यांच्या सोबत आहेत : संजय शेटे

लातूर : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत फूट पडल्याच्या वल्गना केल्या जात असल्या तरी त्यात काहीच तथ्य नाही. कारण अद्यापही ९९ टक्क्यांहून अधिक कार्यकर्ते पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या सोबतच असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष संजय शेटे यांनी रविवारी लातुरातपत्रकारांशी बोलताना केले. अजित पवारांसोबत गेलेल्या बोटांवर मोजण्याइतपत कार्यकर्त्यांमुळे पक्षात फूट पडली असे म्हणणे बालिशपणाचे आहे. तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नसून अजितदादा मित्र मंडळ असल्याची खिल्ली उडवून संजय शेटे पुढे म्हणाले की, शरद पवार एक व्यक्ती नसून एक विचार - शक्ती आहेत. त्यामुळेच आपण अगदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेच्या आधीपासूनच त्यांच्या सोबत कार्य करत आहोत. लातूर जिल्ह्यात आजपावेतो राष्ट्रवादी काँग्रेसची पाळेमुळे मजबूत होऊ शकली नव्हती, ही वस्तुस्थिती आहे. याची अनेक कारणे आहेत, त्यापैकी बहुसंख्य करणे सर्वज्ञात आहेत. त्यामुळे आज आपण त्यावर कोणतेही भाष्य न करता केवळ एवढेच सांगू इच्छितो की, आजपर्यंत जे राष्ट्रवादीच्या बाबतीत घडले ते यापुढील काळात घडणार नाही. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पार्टीचे संघटन वाढविण्यासाठी आपण जिल्ह्यातील ज्येष्ठ नेत्यांना




सोबत घेऊन सर्वतोपरी उपाययोजना करणार आहोत. जिल्ह्यातील कार्यकर्ते अजूनही पूर्ण ताकदीनिशी शरद पवार यांच्या पाठीशी आहेत, याची प्रचिती आपणास नुकत्याच पार पडलेल्या पार्टीच्या पहिल्याच बैठकीत आली. आपण लवकरच जिल्ह्याचा दौरा करून पार्टीची जिल्हा कार्यकारिणी घोषित करणार आहोत. तसेच पार्टीच्या निर्णयानुसार दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी पार्टीचे नेते, आपण स्वतः एक तास राष्ट्रवादीसाठी या धोरणानुसार पक्षवृद्धीसाठी प्रयत्नशील राहणार आहोत. येणाऱ्या नगर परिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद - पंचायत समिती , विधानसभा निवडणूका राष्ट्रवादी काँग्रेस पूर्ण शक्तीनिशी लढवणार आहे. लातूर जिल्ह्यातील उदगीर आणि अहमदपूर विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना आपण विक्रमी मतांनी निवडून आणणारच असा दावाही संजय शेटे यांनी केला. पक्ष संवर्धनाबरोबरच शेतकऱ्यांच्या समस्यांची सोडवणूक करणे, शेतीमालाला योग्य भाव मिळवून देणे, जिल्हा परिषद शाळांचे खाजगीकरण रोखणे ,शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी आंदोलने करणे यासाठीही आपण सातत्याने पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, माजी मंत्री विनायकराव पाटील, माजी आमदार शिवराज तोंडचिरकर, जिल्हा कार्याध्यक्ष बापूसाहेब पाटील, रशीद शेख, शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार, भरत सूर्यवंशी, रेखाताई कदम,निशांत वाघमारे, स्नेहा मोटे, बकतावर बागवान,सुधीर साळुंखे, परमेश्वर पवार, बस्वराज रेकुळगे, आर.झेड. हाश्मी, इरफान शेख, , सय्यद फेरोज, उमाकांत ढावारे आदींची उपस्थिती होती.

# रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पदी : विरेंद्र (भाऊ) लगाडे यांची निवड

नवी मुंबई / के. एच. हनवते :- रिपब्लिकन सेना राष्ट्रीय अध्यक्ष, बहुजन हृदय सम्राट, तरुणांचे प्रेरणास्थान, इंदु मिल आंदोलनकर्ते, सरसेनानी : आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या आदेशाने व समाज भूषण रिपब्लिकन सेना महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष : काकासाहेब खंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली - विरेंद्र (भाऊ) लगाडे यांची रिपब्लिक सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. बहुजन हृदय सम्राट युवकांचे प्रेरणास्थान सर सेनानी आनंदराज आंबेडकर साहेब यांचे खूप खूप आभार मानतो की मला त्यांनी त्यांच्या पक्षामध्ये काम करण्याची संधी दिल्याबद्दल. मि अगामी काळात आंबेडकर घराण्याशी एकनिष्ठ आणि प्रमाणीक राहुन नवी मुंबई मधे रिपब्लिकन सेनेला उंच शिखरावर घेऊन जाणे आणि समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी मोर्चे, आंदोलन करून



सामाजिक प्रश्न सोडवणार, व रिपब्लिकन सेनेला मजबूत करणार..!आसी प्रतिक्रिया नवनियुक्त नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : विरेंद्र लगाडे यांनी दिली.

# व्हि.के.आचार्य यांनी स्वतःचे दारुचे दुकाने सरकार जमा करून चैत्यस्मारकाचा हिशोब सार्वजनिक करण्याच्या मागणी करिता

### देवधर बनसोडे यांचे आंबेडकरांच्या अस्थी कलशा जवळ बेमुदत अन्नत्याग आत्मक्लेश अमरण उपोषण सुरु

पानगांव / विष्णु आचार्य :- पानगांव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चैत्यस्मारक ट्रस्टचे अध्यक्ष व्हि.के.आचार्य यांनी स्वतःचे दारुचे दुकाने सरकार जमा करून चैत्यस्मारकाचा हिशोब सार्वजनिक करावा या मागणी करिता लातुर येथील देवधर बनसोडे हे गेल्या दोन दिवसापासुन पानगांव येथे असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थी कलशा जवळ बेमुदत अन्नत्याग आत्मक्लेश अमरण उपोषणाला बसल्याने आंबेडकर अनुयांयीमध्ये एकच खळबळ माजली आहे.

महाराष्ट्रात मुंबई,वगळता केवळ मराठवाड्यातील पानगांव ता.रेणापुर जि.लातुर येथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी आहेत.या पवित्र अस्थींना अभिवादन करण्या करिता दरवर्षी ६ डिसेंबर या त्यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मराठवाड्यासह सिमावर्ती आंध्रप्रदेश,तेलंगणा, कर्नाटक राज्यातुनही लांखो आंबेडकरी अनुयांचींची गर्दी उसळत असते.परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर चैत्यस्मारक ट्रस्टचे अध्यक्ष व्हि.के.आचार्य माजी दारूबंदी अधिकारी




यांचे पानगांवात दारूचे दुकाने आहेत.ज्या महामानवाने पंचशील व बावीस प्रतिज्ञा देवुन शिल पालन करण्यास शिकवीले त्या महामानवाचा आणि येथे येणाऱ्या प्रत्येक अनुयांयीचा अपमान होत आहे. सदरचे दारू दुकाने ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी ही चालुच रहातात.चैत्यस्मारक ट्रस्टचे अध्यक्ष व्हि.के.आचार्य यांनी आपले दारुचे दुकाने सरकारकडे जमा करावीत,चैत्य स्मारकाचा आजपर्यंतचा सर्व जमाखर्च हिशोब ताळेबंदसह सार्वजनिक करावा.म्हणजेच एक तर दारुचे दुकान चालवावीत किंवा चैत्यस्मारक विहार चालवावे अ अशा मागणीचे निवेदन दि.२७ डिसेंबर रोजी लातुरचे जिल्हाधिकारी,लातुरचे पोलीस अधिक्षक, रेणापुरचे तहसीलदार यांना देवुन ४ जानेवारी पर्यंत मागण्यांचा विचार व्हावा अन्यथा (दि.५) पासून पानगांव येथे असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलशा जवळ बेमुदत अन्नत्याग आत्मक्लेश अमरण उपोषणाला बसणार असल्याचे लेखी निवेदन दिले होते त्यानुसार त्यांनी शनिवार (दि.६ ) पासून उपोषणाला सुरवात केली असून आज उपोषणाचा तिसरा दिवस आहे. यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर चैत्य स्मारक ट्रस्टचे आणि ट्रस्टचे अध्यक्ष व्हि.के.आचार्य यांच्या कारभारा विषयी आंबेडकरी अनुयायी मधे उलट सुलट चर्चा केली जात आहे.

# डॉ.आंबेडकर विधी महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले जयंती साजरी






वडाळा :- मुंबई येथील पीईएस शिक्षण संस्थेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले जयंती नुकतीच साजरी करण्यात आली.प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध लेखक व व्याख्याता तथा मुंबई विद्यापीठ इतिहास विभाग प्रमुख डॉ. प्रा. संदेश वाघ होते. त्यांनी सावित्रीमाई फुले यांचे कार्य व फुले शाहू आंबेडकरी चळवळीवर आपले अभ्यासपूर्ण विचार मांडले.कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्र. प्राचार्या डॉ.यशोधरा वराळे मॅडम होत्या. विचारमंचावर डॉ. जावळे , उपप्राचार्य प्रा. सुभाषचंद्र सोनकर , प्रा . प्रीती धोत्रे , विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून बालूशा माने, सुमेध सावंत यांनी आपले विचार व्यक्त केले. वडरेराव अन्य मान्यंवर उपस्थितीत होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मधुकर वारभुवन यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारीवर्ग व विद्यार्थ्यांनी बहुमोल सहकार्य केले.या प्रसंगी ' कायदेशीर मदत केंद्राचे ' उद्घाटन डॉ. प्रा संदेश वाघ यांच्या हस्ते करण्यात आले.

# क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जन्मगावी उपासिका धम्म प्रशिक्षण शिबिराचा सांगता समारंभ संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :- ( नायगाव ) तालुका खंडाळा, जि सातारा येथे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचा जन्म जिथे झाला त्या नायगाव येथे दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, शाखा : जुईनगरच्या वतीने दिनांक २५ डिसेंबर २०२३ पासून सुरु झालेल्या दहा दिवसांच्या उपासिका धम्म प्रशिक्षण शिबिराचा सांगता समारंभ क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जन्म गावी, नायगाव येथे बुधवार, दि ३ जानेवारी २०२४ रोजी संपन्न झाला. पाच तासाच्या प्रवासानंतर दुपारी १२.३० वा आम्ही नायगाव येथे पोचलो. क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती असल्यामुळे विविध क्षेत्रातील कार्यकर्ते, शाळा-कॉलेज मधील विद्यार्थी, त्यांचे शिक्षक - पालक, विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते यांची गावात गर्दी उसळली होती. आम्ही सावित्रीमाईचे घर, वाडा, तेथील स्मारकाला प्रथमत भेट दिली. दुपारी साडेतीन चार पर्यंत एका मंदिराच्या मोकळ्या जागेत जेवणे उरकून सांगता समारंभाची सुरुवात भगवान बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमाना हार घालून, अगरबत्ती, मेणबत्ती प्रज्वलीत करून करण्यात आली. जुईनगर शाखेचे अध्यक्ष : बी. सी. सोनावले गुरूजी, सरचिटणीस सुधीर जगधनी, खजिनदार अरुण आढाव, संस्कार उपाध्यक्ष भाऊसाहेब केदारे, संघटिका हेमलता उके आणि कार्यालयीन सचिव अशोक बनसोडे यांच्या संयोजनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. शिबीरार्थिंची तोंडी परीक्षा घेण्यासाठी नवी मुंबई जिल्हा शाखेचे पाच पदाधिकारी उपस्थित होते. १. संस्कार उपाध्यक्ष चंद्रकांत माने, २. संस्कार सचिव प्रकाश भालेराव, ३. संघटक राजश्रीताई पारधे, तसेच जिल्हा महिला




शाखेच्या ४. अध्यक्षा शोभाताई कांबळे, ५. कार्यालयीन सचिव अनुष्काताई मोरे यांनी शिबिरार्थिंची तोंडी परीक्षा घेतली. प्रथमत : जिल्हा शाखेचे संस्कार उपाध्यक्ष चंद्रकांत माने यांनी उपासिका धम्म प्रशिक्षणातील महिलांना यथोचित मार्गदर्शन केले. महिला शाखेच्या अध्यक्षा शोभाताई कांबळे यांनी शुभेच्छा दिल्या. शाखा अध्यक्ष सोनावले गुरुजी यांनी या शिबिराचे महत्व सांगून शिबिरार्थिंना उपदेश केला. नंतर परीक्षकांनी शिबिरार्थिंची तोंडी परीक्षा घेतली. सर्वांनीच समाधानकारक उत्तरे दिली. परीक्षेचा भाग म्हणून पहिले तीन क्रमांक जाहीर करण्यात आले. सरणत्तय घेऊन कार्यक्रम संपला असे जाहीर करण्यात आले.* सायंकाळी सात वाजता परतीचा प्रवास सुरु झाला. रात्रौ ११ वा सर्वजण सुखरूपपणे जुईनगर येथे पोचले. सदर कार्यक्रमात महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी गायक दाजी बिडकर यांनी बुध्द - भिम गिते व क्रांतिज्योती सावित्रीमाई ज्योतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त गित गायनातून समाज प्रबोधन केले.

# सोने समजून चक्क अस्थीची गोणी पळवली

छत्रपती संभाजीनगर : सावडण्याच्या कार्यक्रमानंतर गोणीत भरून ठेवलेली अस्थी आणि राखेला सोनं असल्याच्या अंदाजावरून चोरट्यांनी गोणी दुचाकीवर टाकून पसार झाले. ही बाब लक्षात येताच ग्रामस्थांनी दुचाकी स्वार चोरट्यांचा पाठलाग केला. ग्रामस्थ पाठलाग करत असल्याचे लक्षात येताच चोरट्यांनी गाडी पळवली. दरम्यान, अंतरवली खांडी रोडवर राखेसह चोरट्यांना ग्रामस्थांनी ताब्यात घेतले. चोरट्यांना जाब विचारत दोघांनाही पोलिसांच्या ताब्यात दिले. पैठण तालुक्यातील कडेठाण बुद्रुक गावात ही विचित्र घटना घडली.ज्ञानेश्वर सूर्यभान तळपे रा. कडेठाण, बाळू मिसाळ रा. कडेठाण, मंदा पांडुरंग गायकवाड रा. इंदिरानगर पैठण असे राख चोरणा-या चोरट्यांची नाव आहे.दरम्यान, या प्रकरणी स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, कडेठाण बुद्रुक येथील सीमाताई पवार यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. दरम्यान, अंत्यसंस्कारानंतर राख सावडण्याचा कार्यक्रम होता. सावडल्यानंतर राख गोणीत भरण्यात आली. त्यानंतर कुटुंबीय आणि नातेवाईक घरी गेले.गोणीत भरलेली राख पैठणला घेऊन जाण्यासाठी घरातील काही सदस्य दुचाकी आणण्यासाठी गावात गेले होते.

# सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा बालविकास प्रकल्प कार्यालयास विसर - कार्यवाहीची मागणी

किनवट ता. प्रति. (शेख शौकत) :- किनवट येथील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयात एका शिपायाशिवाय कोणीही कर्मचारी उपस्थीत नसल्याने या कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरीच करण्यात आली नाही. या कार्यालयात बालविकास प्रकल्प आधिकारी १५ महिला पर्यवेक्षिका आहेत. त्यातील १४ पर्यवेक्षिका या कार्यालयात अनुपस्थित दिसून आल्या केवळ एकच पर्यवेक्षीका यांचा सुट्टीचा अर्ज ठेवला होता त्यांच्याकडे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचा पदभार आहे त्यांचा एकमेव सुट्टीचा अर्ज कार्यालयात दिसून आला विशेष म्हणजे तालुक्यातील ४५३ अंगणवाडी त्यात २१ हाजार ९२१ बालके आहेत प्रलंबीत मागण्यासाठी कर्मचाऱ्यांचा संप असल्यामुळे त्या मागील काही दिवसापासून अंगणवाड्या बंद आहेत. त्यामुळे सर्व पर्यवेक्षीकांना किनवट येथील कार्यालयात हजर राहणे गरजेचेच आहे. यातील अकरा पर्यवेक्षीका नांदेड येथुन ये-जा करतात त्यामुळे या प्रकल्पाचे काम रामभरोसेच चालत आहे. सामाजिक कार्यकर्ते प्राध्यापक विजय खुपसे आदिवासी नेते गोपीनाथ बुलबुले यांनी काही कामानिमित्त कार्यालयात गेले असताना हा धक्कादायक प्रकार लक्षात आला. या कार्यालयातील अनागोंदी कारभाराची जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करून या कार्यालयात कर्मचाऱ्यांसाठी क्यू आर कोड प्रणाली सुरू करावी अशी मागणी ही त्यांनी केले जि.प.च्या मुख्यकार्यकारी अधिकारी यांचेकडे केली आहे. किनवट या आदिवासी दुर्गम भागातील लहान मुलांचे आरोग्य सुदृढ राहावे






गरोदर माता स्तनदा माता व मुलींना चांगले आरोग्य राहण्यासाठी व बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत ४५३ अंगणवाड्या आहेत. प्रत्येक अंगणवाडी सेविका आणि मदतनीस आहे विस्ताराने मोठ्या असलेल्या किनवट तालुक्यातील अंगणवाडीच्या कामात सुसूत्रता येण्यासाठी नुकतेच बालविकास प्रकल्प कार्यालयाचे विभाजन करून उत्तर आणि दक्षिण असे दोन बाल विकास प्रकल्प कार्यालय कार्यान्वित केले आहेत या दोन्ही कार्यालयाचा पदभार श्रीमती ठकरोड यांचेकडे आहे त्या सध्या सुट्टीवर असल्याने दोन कार्यालयापैकी दोन ज्येष्ठ पर्यवेक्षकांना हा पदभार दिला आहे. त्यातील एका पर्यवेक्षिका यांनी सुट्टीचा अर्ज कार्यालयात ठेवला पण दुसऱ्या पर्यवेक्षकांनी मात्र नांदेड येथे चार जानेवारी रोजी कार्यालयीन सुनावनी असल्यामुळे त्या तीन तारखेपासूनच नांदेड येथे आहेत. याबाबत त्यांनी कुठलाही अर्ज कार्यालयात ठेवला नाही त्यातच १४ पैकी एकही पर्यवेक्षिका आज कार्यालयात उपस्थित नव्हत्या त्यातील दहा पर्यवेक्षिका या मुख्यालय न राहता दररोज नांदेड येथून ये जा करतात आणि सध्या अंगणवाडीचा संप असल्याने या पर्यवेक्षकांना मुख्यालयी हजर राहणे गरजेचे असताना त्या अनुउपस्थीत होत्या कार्यालयातील कारकुन सुद्धा नांदेड येथे कामासाठी गेल्याचे सांगण्यात आले तर केवळ एक महिला शिपाईच कार्यालयात उपस्थित होत्या वास्तविक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती असलेल्या दिवशी कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित राहणे गरजेचे होते व सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करणे शासनाकडून बंधनकारक असतानाही या कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई यांची जयंती साजरी झालीच नाही कामामध्ये कुचरायी करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे लक्ष ठेवण्यासाठी आता जिल्हा परिषदेने क्यूआर कोड टप्प्याटप्प्याने प्रत्येक विभागात सुरू केला आहे एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयातही या क्यूआर कोडची सुरुवात करण्यात यावी घर भाडे आदिवासी प्रोत्साहन भत्ता घेऊन ही या कार्यालयातील कर्मचारी नांदेडहून ये-जा करत असतील तर त्यांचेवर कारवाई करण्यात यावी कुठलीही पूर्वसूचना न देता कार्यालयात आज अनुपस्थित असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर एक दिवसाचा वेतन कपात करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी ही सामाजिक कार्यकर्ते तथा आदिवासी नेते प्राध्यापक विजय खुपसे व गोपीनाथ बुलबुले यांनी केली आहे.

# समाज मनाच प्रतिबिंब म्हणजेच पत्रकारिता..! जेष्ठ पत्रकार माध्यम सल्लागार राजेंद्र हुंजे यांचे प्रतिपादन

अहमदपूर दि.०८ :- पत्रकारिता म्हणजे समाजातील घडामोडिचे सुक्ष्म निरिक्षण करुन वास्तव्य, सत्यता मांडणे होय. समाज मनाच प्रतिबिंब म्हणजे पत्रकारिता असल्याचे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार, मुंबई येथील माध्यम सल्लागार राजेंद्र हुंजे यांनी केले.

ते येथील साहित्य संगीत कला अकादमीच्या वतीने आयोजित दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सत्कार तसेच दर्पण सेवा गौरव आणि जीवन गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात सत्काराला उत्तर देताना बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार बब्रुवानजी खंदाडे हे होते. तर यावेळी भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपरावजी देशमुख यांच्या शुभहस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी मनिष कल्याणकर, माजी सभापती अशोकराव केंद्रे, भाजपा तालुका अध्यक्ष प्रतापराव पाटील, जेष्ठ नेते गोपिनाथ जोंधळे, माजी नगराध्यक्षा सरस्वती कांबळे, शहरप्रमुख लक्ष्मणराव आलगुले, डॉ. मधुसुदन चेरेकर,सूभाषराव सोनकांबळे,मधुसूदन चेरेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना राजेंद्र हुंजे म्हणाले की, आजची पत्रकारिता म्हणजे मोबाईल जर्नालिझम आहे. मोबाईच्या माध्यमातुन आपण मॅसेजव्दारा बातमी प्रसारित करु शकतो. पत्रकारिता क्षेत्रात कार्य करीत असताना काय वाचतोय, त्यातुन काय घेतोय, हवे ते घेतो आणि नको ते देतो यात पत्रकारिता भरडली जात आहे. लेखनीतुन दुसर्याला गोळी मारण्याचे कार्य करु नये, यामुळे लेखन करणाराही झोपत नाही आणि ज्यावर लेखन झाले आहे तो ही झोपत नाही. अश्या प्रकारची पत्रकारिता करण्यापेक्षा जे वास्तव आहे ते निर्भिडपणे मांडण्याचे धाडस पत्रकारामध्ये असले पाहिजे. आज प्रत्येक पत्रकार आप-आपल्या परिने बातमीच्या माध्यमातुन आपली बाजु मांडत आहे. यासाठी आत्मपरिक्षण करण्याची गरज



आहे. आजच्या बदलत्या युगामध्ये पत्रकारांनी स्वतःला बदलुन काळाच्या ओघाप्रमाणे माध्यमाचा वापर करुन पत्रकारिता केली पाहिजे. पत्रकारांनी आपल्या ध्येय, धोरणावर ठाम राहुन निर्भिडपणे आपली बाजु मांडली पाहिजे. कशीही परिस्थीती निर्माण झाली तरी आपली एकतर्फि बाजु मांडणे योग्य नाही. राजकारण्यांचा, प्रशासकिय अधिकार्यांना तुमच इथं चुकत ही सांगण्याची ताकद बाजुला ठेवून त्यांची वाहवा करण्यासाठी पत्रकारिता नाही आहे. पत्रकारिता हा खडतर प्रवास असुन सरधोपटपणे चालणारी पद्धकारिता नाही. हो ला हो म्हणणे आणि राजकीय नेत्यांच्या बाजुने उभे राहुन कार्य करणे ही पत्रकारिता नाही. अश्यांना जाब, प्रश्न विचारण्यांची धमक पत्रकारांत असली पाहिजे. राजकीय पत्रकारिता करुन उपयोग नाही. यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, कृषिवियक अश्या विविधअंगानी पत्रकारिता करणे गरजेचे आहे. पत्रकारांनी चौकस बुद्धीने पत्रकारिता करावी. आपली लेखनी हे शस्त्र आहे या शस्त्राचा उपयोग समाज उत्थानासाठी केला पाहिजे असेही ते शेवटी म्हणाले. यावेळी माध्यम सल्लागार राजेंद्र हुंजे यांना दर्पण जीवन गौरव पुरस्कार तर दर्पण सेवा गौर पुरस्कार म जेष्ठ पत्रकार रामलिंग तत्तापुरे व जेष्ठ पत्रकार रंगनाथ वाघमारे यांना देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या वेळी बोलताना दिलीपराव देशमुख म्हणाले की,पत्रकारीता हे सतीचे वाण असून विकासात्मक पत्रकारीतेची कास धरावी असे अवाहन केले. प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाक्के पाटील म्हणाले की,समाजातील सर्वच घटकांसाठी पत्रकार झटत असतात अशा पत्रकारांचा सूध्दा सन्मान झाला पाहीजे यासाठी अकादमीचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगीतले. तर अध्यक्षीय समारोप करताना माजी आमदार बब्रुवान खंदाडे म्हणाले की,पत्रकार हे समाजाचे प्रतिबिंब आहे.सुदृढ समाजासाठी पत्रकारांचे योगदान अतुलनीय असून वास्तववादी पत्रकारीता ही चिरकाल टिकते त्यासाठी पत्रकारांनी वास्तवतेची कायम कास धरावी तसेच राज्यात प्रत्येक आमदारांनी खासदारांनी आपल्या स्थानिक विकास निधीतून इलेक्ट्रॉनिक बस त्या त्या आगाराला द्यावी असं अवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहित्य संगीत कला अकादमीचे अध्यक्ष डॉ.सिध्दार्थकुमार सुर्यवंशी यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. मारोती बुद्रुक पाटील व प्रा. डॉ. बालाजी कारामुंगीकर यांनी केले. उपस्थितांचे आभार राहुल सुर्यवंशी यांनी मानले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गफारखॉन पठाण,अजय भालेराव, दिलीप भालेराव, विजय कुंठे, प्रशांत जाभाडे, सचिन बानाटे, आकाश सांगवीकर, आकाश पवार, कैलास सोनकांबळे, बालाजी मस्के, शरद कांबळे, विलास चापोलीकर आदिंनी परिश्रम घेतले.

यावेळी अहमदपुर चाकुर तालुक्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# लामन डेव्हलपर्स प्रस्तुत, तसेच लेख माहेरचा कट्टा आयोजित विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी



नवी मुंबई येथे नारीरत्न गौरव पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून गंगोत्री फिल्म प्रोडक्शन तसेच विश्वास महाराष्ट्राचा न्यूज चॅनल चे मुख्य संपादक श्री लक्ष्मीकांत पोपळे यांना निमंत्रित केले होते. आणि त्या ठिकाणी त्यांचा सत्कार डॉक्टर विशाल माने (सहाय्यक पोलीस निरीक्षक विशेष शाखा नवी मुंबई यांच्या हस्ते करण्यात आला.

# उल्हासनगरात खोदलेल्या रस्त्यामुळे शहरात धुळी चे साम्राज्य पाणी फवारणी चे ढोंग

उल्हासनगर / प्रतिनिधी : ईगल इन्फ्रा कॅन्स्ट्रक्शन कंपनीच्या वतीने शहरात भुयारी गटारीचे पाईप टाकण्यासाठी खोदलेले रस्ते वेळीच दुरुस्त केले नसल्याने शहरात धुळी चे साम्राज्य निर्माण झाले असून धुळीच्या त्रासा मुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. ईगल इन्फ्रा कपंनी च्या कामकाजा ची गंभीर दखल महापालिका आयुक्तानी घेतली आहे. उल्हासनगरात ४२३ कोटीच्या भुयारी गटार योजनेला मंजुरी मिळाली असून गटारीचे पाईप टाकण्याचे काम वादग्रस्त ईगल इंफ्रा कंट्रक्सन या कपंनी ला मिळाले असून एमएमआरडीएने १५० कोटीच्या निधीतून एकूण सात रस्ता बांधणीला मंजुरी दिली आहे . हे रस्ते बांधण्यापूर्वी रस्त्यात भुयारी गटारी टाकण्यात येत आहे. मात्र ईगल इन्फ्रा कपंनी च्या वतीने खोदलेले रस्ते तात्पुरते बुजविल्याने सर्व रस्ते धुळीने माखले आहेत. या धुळीमुळे नागरिक हैराण झाले असुन महापालिका यंत्राद्वारे पाणी फवारणी करण्यात येत आहे. परंतु ही फवारणी पुरेशी नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. या धुळी मुळे शहरातील हवेच्या प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. शहरातील भुयारी गटार योजने अंतर्गत गटारी पाईप टाकण्यासाठी खोदलेले रस्ते संबंधीत ठेकेदाराने त्वरित पक्के रस्ते दुरुस्ती करण्याची अट असताना खोदलेले रस्ते दुरुस्त का करण्यात येत नाही ? असा सवाल उपस्थित होत आहे . भुयारी गटारीचे पाईप टाकण्याचे काम दोन ते तीन महिन्यांपूर्वी होऊनही रस्त्याच्या बांधणीला सुरवात झालेली नाही. या शिवाय खोदलेले रस्ते संबंधित ठेकेदारा द्वारे दुरुस्त करण्यात आले नसल्याने रस्त्यांची दुर्दशा झाली असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

महापालिकेचा बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी संबंधित ठेकेदारांचे रस्ता दुरुस्तीचे पैसे वाचविण्यासाठी त्याला पाठीशी घालत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या बाबत .आयुक्त अजीज शेख यांना विचारले असता त्यांनी सांगितले की रस्त्यांच्या कामाला गती मिळाली असून भुयारी गटारां च्या कामावर महापालिकेच्या अभियंता ची नजर असुन चुकी चे काम होऊ देणार नाही अशी ग्वाही श्री शेख यांनी दिली आहे.

# मुद्रांक अभय योजनेचे केंद्र उल्हासनगरात उघडण्यात यावे , महापालिका आयुक्त

उल्हासनगर : राज्यात महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना -१ डिसेंबर, २०२३ ते दिनांक ३१ जानेवारी, २०२४ आणि दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२४ ते ३१ मार्च, २०२४ अशा दोन टप्यात राबविण्यात येत असून या मुद्रांक शुल्क अभय योजने चा लाभ उल्हासनगर वासियांनी घेतला पाहिजे असे आवाहन महापालिका आयुक्त अजीज शेख यांनी एका पत्रका द्वारे केले आहे. अभय योजना बाबत शहरवासियांनी माहिती मिळावी व समजावी यासाठी महापालिकेच्या वतीने नुकतेच महापालिकेच्या सभागृहात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी व लाभार्थीच्या शंकाचे निरसन करण्यासाठी सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी ओमप्रकाश जांभळे उपस्थित होते .

सदर योजने बाबत दुय्यम निंबधक विभागाच्या वतीने शहरातील नागरिकांना योग्य सहकार्य मिळत नसल्याने आणि मुद्रांक अभय योजनेचा अर्ज स्वीकारण्या शहरात कुठे ही केंद्र अथवा कार्यालय नसल्याने नागरिकांना ठाणे येथील कार्यालयात धाव घ्यावी लागत असल्या मुळे नागरिकांचे अतोनात हाल होत आहे. या मुळे सदर अभय योजने ला कमी प्रतिसाद मिळत असल्याने ही बाब महापालिका आयुक्त अजीज शेख यांच्या लक्षात आल्या नंतर त्यांनी दुय्यम निंबधक ठाणे यांना सूचित केले की नागरिकांना च्या सोई साठी उल्हासनगरात मुद्रांक अभय योजने चे केंद्र उघडण्यात यावे या अभय योजने चा नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ करुन घ्यावा असे आवाहन आयुक्त अजीज शेख यांनी केले आहे

# चोरलेले दागिने विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक. ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त.

लातूर :-चोरलेले दागिने विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक. ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त.*

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी लातूर जिल्ह्यामध्ये घडणाऱ्या चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता आदेशित केले होते. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अधिकारी/अमलदारांचे पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकामार्फत जिल्ह्यातील विविध गुन्हेगारांची माहिती एकत्र करून त्याचे विश्लेषण करण्यात येत होते. तसेच गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून माहिती घेण्यात येत होती.

दरम्यान ०८/०१/२०२४ रोजी१०:३० पोलीस पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून चोरलेले सोन्याचे दागिने विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीला औसा रोड परिसरातून ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांने त्यांचे नाव भरत इंद्रजीत कदम, वय २७ वर्ष, राहणार पवार नगर,औसा



असे असल्याचे सांगितले. नमूद आरोपीला ताब्यात घेऊन सखोल विचारपूस केली असता त्याने सांगितले की, दिनांक ०७/०१/२०२४ रोजी पवार नगर, औसा येथील घरातून चोरी केली आहे.

त्यावरून औसा पोलीस ठाण्याच्या अभिलेखाची माहिती घेतली असता पोलीस ठाणे औसा येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ०५/२०२४ कलम ३८० भादवी प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे दिसून आले.

नमूद आरोपीने वर गुन्ह्यात चोरलेली सोन्याची १५ ग्रॅम वजनाची एक पाटली ९०,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस पोलीस अमलदार मनोज खोसे, साहेबराव हाके, नितीन कठारे, चालक चंद्रकांत केंद्रे यांनी केली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE